## ६-सहाव्या पे कमिशनचे फायदे काय?....

सहाव्या पे-कमिशनच्या शिफारशीवर आधारीत केंद्र सरकारने निर्णय घेऊन त्याचे फायदे दिले.

वाढलेल्या पेन्शनचा फायदा १.१.२००६ पासून दिला. किमान पेन्शन रू. ३५०० केली. जास्तीत जास्त पेन्शन रू. ४५००० केली. बेसिक पेन्शनवर ४० टक्के वाढदिली. सुधारीत पेन्शन ठरवतांना मूळ पेन्शनवर मिळणारा संपूर्ण महागाई भत्ता समाविष्ट केला व सुधारित पेन्शनवर नव्या दराने महागाई भत्ता दिला.

सर्वात महत्वाची व क्रांतीकारक अशी पे-कमिशनची शिफारस म्हणजे वयाच्या ८० वर्षानंतर टप्प्या टप्प्याने पेन्शनमध्ये वाढ

८० ते ८५ - २० टक्के.  ८५ ते ९० - ३० टक्के

९० ते ९५ - ४० टक्के.  ९५ ते १०० - ५० टक्के

१०० वयापासून पेन्शनमध्ये १०० टक्के वाढम्हणजे एकदम दाम दुप्पट. ही वाढसुधारित पेन्शनवर निर्देशित टक्केवारीने असेल शिवाय या वाढीवर सुधारित दराने महागाई भत्ताही मिळेल.

वरील सर्व फायदे फॅमिली पेन्शनर्सनाही दिले जातील. मध्यंतरी काही काळ ७५ वयानंतर पेन्शन बंद होणार की काय अशी भिती वाटत होती. बंद होणे तर सोडाच पण आता ८० व्या वर्षापासून वाढदिली आहे. ता. १.१.२००६ रोजी मिळणारी पेन्शन (उदा. रू. ५०००) अधिक महागाई भत्ता समाविष्ट (रू. ५००० वर रू. ४३००) आणि बेसिक पेन्शनच्या ४० टक्के वाढ(रू. ५००० व रू. २०००) याची बेरीज म्हणजे नवीन पेन्शन (रू. ११३०० सुधारीत दराने) या पेन्शनवर ता. १.७.२००८ पासूनचा १६ टक्के महागाई भत्ता (रू. १८०८) असा बदल करण्यात आला.

ही वाढसमजण्यासाठी मूळ पेन्शन (उदा. रू. ५०००) ला २.२६ ने गुणले की नवीन पेन्शन समजते (रू. ११३००). जुन्या मूळ पेन्शनला (रू. ५०००) १२.१४२२ ने गुणले की ३३ महिन्याची थकबाकी कळते. वय ८२ असेल तर सुधारित मूळ पेन्शनच्या (रू. ११३००) २० टक्के (म्हणजे रू. २२६०) जास्तीची वाढशिवाय या जास्तीच्या पेन्शनवर महागाई भत्ता (ता. १.७.०८ पासून १६ टक्के) मिळणार आहेच.

जास्तीच्या वाढीचा फायदा फॅमिली पेन्शनर्सनाही मिळणार आहे. त्यांची जन्मतारीख पीपीओ मध्ये उपलब्ध नसल्याने, त्यांना आपल्या वयाचा दाखला देऊन पेन्शन मंजूर करणाऱ्याा अधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल तो पत्ता पी.पी.ओ. मध्ये शिक्क्याच्या स्वरूपात असेल.

ता. १.१.२००६ पासूनचे सुधारित दर खाली दिल्याप्रमाणे असतील. कंसात पूर्वीच्या महागाई भत्त्याचे दर माहितीसाठी दिले आहेत.

| | |
|---|---|
| ता. १.१.२००६ पासून शुन्य टक्के | (जुना दर २४ टक्के) |
| ता. १.७.२००६ पासून २ टक्के | (जुना दर २९ टक्के) |
| ता. १.१.२००७ पासून ६ टक्के | (जुना दर ३५ टक्के) |
| ता. १.७.२००७ पासून ९ टक्के | (जुना दर ४१ टक्के) |
| ता. १.१.२००८ पासून १२ टक्के | (जुना दर ४७ टक्के) |
| ता. १.७.२००८ पासून १६ टक्के | (जुना दर ५४ टक्के) |

पेन्शनमधील वाढ व त्यानूसार येणाऱ्या महागाई थकबाकीची ४० टक्के रक्कम पेन्शन अदा करणाऱ्या पोस्ट ऑफिस/बँकांनीच द्यावयाची आहे.

४० टक्के यावर्षी व ६० टक्के १.४.२००९ नंतर देणार या शिवाय पॅरा ४.२ अन्वये पेन्शन बाबतची आणखी एक तरतूद आहे. ती मूळ इंग्रजी मध्ये मुद्दाम दिली आहे.

The revised pension in 'no case' shall be lower than fifty percent of the pay is the pay bond plus the grade pay, corresponding to the pre-revised pay scale from which the pensioner had retired.

आपण जर प्रि-रिव्हाइजड् आणि रिव्हाइजड् पे स्केलस् पाहिली तर असे लक्षात येईल की जुन्या १२०००-१८००० पे स्केल (एस.२३) समकक्ष नवीन स्केल१५६०० ते ३९१०० आहे. पूढील (एस-२४) १४३००-१८३०० चे नवीन समकक्ष स्केल ३७४००-६७००० आहे. हा एस-२३ आणि एस-२४ मधील फरक खूपच मोठा आहे. त्यामुळे एस-२४ पासून पूढच्या स्केल मधील अधिकारी वर्गाला या तरतूदीचा फायदा मिळू शकेल.

उदा. एक ॲडिशनल कमिशनर इन्कमटॅक्स एस-२४ म्हणजे १४३०० ते १८३०० या स्केल मधून रिटायर झाले व त्यांची पेन्शन रू. ७१५० या दराने मंजूर झाली. जुनी पॅरा. ४.१ च्या तरतुदीनूसार त्यांची पेन्शन ७१५० x २.२६ = १६१५९ अशी नवीन पेन्शन येते.

तथापी या ऑफिसरच्या एस-२४ (१४३००-१८३००) चे समकक्ष स्केल ३७४००-६७००० अधिक ग्रेडपे रू. ८७०० असे आहे. त्यांचे बाबतीत (३४७०० अधिक ८७००) च्या ५० टक्के म्हणजे रू. २३०५० होतात. त्यामुळे त्यांची पेन्शन रू. १६१५९ ऐवजी रू. २३०५० होते. अशाप्रकारे पेन्शन सुधारीत करून घेण्यासाठी त्यांना आपल्या पेन्शन मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागेल. त्यानंतर त्यांचा सुधारित पी.पी.ओ. मंजूर होईल व त्याचे मूळ पेन्शनमध्ये वाढहोईल.

अशाप्रकारे प्रत्येक पे-कमिशनने पगारामध्ये त्याचप्रमाणे पेन्शनमध्ये वाढकेली आहे. उदाहरणच सांगायचे झाले तर १.१.९६ पूर्वी निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची मूळ पेन्शन रू. २२५० होती. ५ व्या पे-कमिशनमुळे ती रू. ६०१५ झाली व आता सहाव्या पे-कमिशनमुळे रू. १३५९५ झाली आहे. किमान पेन्शन ही रू. ३७५ ची रू. १२७५ व आता सहाव्या पे कमिशन मुळे रू. ३५०० झाली आहे.

शासनाने सध्या पेन्शन बाबतचे निर्णय घेतले आहेत. मेडिकल अलौंस मध्ये वाढकिंवा मेडिकल इन्शुरन्स स्कीम बाबतचे निर्णय विचाराधीन आहेत. याबाबतीत काही शंका-कुशंका असतील, खुलासे हवे असतील, तर त्याबाबतीतील आदेश येत राहतील तसे सभासदांच्या माहितीसाठी प्रसृत केले जातील.

**एस. के. देशपांडे**

मुख्य लेखाधिकारी (निवृत्त)

पेन्शनर्स असोशिएशन, १२८५,

सदाशिव पेठ, पुणे-३०.